## निवडक

### गोवा बोर्डाच्या पेडणे परीक्षा केंद्राची दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी आसन व्यवस्था

■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. २१ :** १ मार्च २०२५ पासून सुरू होणाऱ्या इयत्ता दहावीच्या गोवा बोर्डाच्या पेडणे केंद्राच्या परीक्षेचे पूर्वनियोजन करण्यासाठी पेडणे तालुका शिक्षणाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात नुकतीच बैठक होऊन त्या बैठकीत केंद्र प्रमुख नरेंद्र नाईक व निरीक्षक उमेश नाईक यांनी सर्व उप केंद्रप्रमुख व परीक्षा सुपरवायझर यांना मार्गदर्शन केले. त्याचबरोबर या बैठकीमध्ये पेडणे परीक्षा केंद्राच्या आसन व्यवस्थेचे नियोजन करण्यात आले ते खालील प्रमाणे.

इयत्ता दहावी परीक्षा मार्च २०२५ दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी आसन व्यवस्था खालील प्रमाणे करण्यात आली आहे. पेडणे – सेंट जोसेफ हायस्कूल पेडणे – उपकेंद्र क्रमांक – एक १६६४४ ते १६८०३, १७२३६, १७२३७, १७२३८. एकूण विद्यार्थी संख्या १६३. श्री भगवती हायस्कूल पेडणे– उपकेंद्र क्रमांक – दोन – १६८०४ ते १६९७३ एकूण विद्यार्थी संख्या १७०. व्हिस्काउंट हायस्कूल पेडणे उपकेंद्र क्रमांक – तीन – १६९७४ ते १७०७३ एकूण विद्यार्थी संख्या १००. गव्हर्नमेंट हायर सेकंडरी स्कूल, पेडणे– उपकेंद्र क्रमांक – चार – १७०७४ ते १७२३५ एकूण विद्यार्थी संख्या–१६२ गणित (लेव्हल वन– २०२१) , एव्हरीडे मॅथेमॅटिक्स(२०३९) सर्व एन.एस. क्यू, एफ (ऑटोमोबाईल, रिटेल, कन्स्ट्रक्शन, लॉजिस्टिक, टुरिझम अँड हॉस्पिटलिटी, आग्रिकल्चर सोलनाच्सीओस क्रॉप) , फाईन आर्ट, हेल्थ अँड फिजिकल एज्युकेशन, अस्त्रोनोमी या विषयांच्या तसेच सर्व सी डब्ल्यू एस एन विद्यार्थ्यांच्या परीक्षा फक्त उपकेंद्र क्रमांक – १– सेंट जोसेफ हायस्कूल पेडणे, येथे होणार आहे. आसन व्यवस्थे संदर्भात अधिक माहिती हवी असल्यास विद्यार्थ्यांनी परीक्षा केंद्रांचे डेप्युटी कंडक्टर मेलीसा ब्रिटो – ८५३०८८७४९८ (सेंट जोसेफ हायस्कूल पेडणे) दामोदर नाईक – ७८७५५०६९५० (श्री भगवती हायस्कूल पेडणे), सुषमा गावडे – ९९२३६५५२७५ , (व्हिस्काउंट हायस्कूल पेडणे) उत्तम परब–९९२३४३८५२० (गव्हर्नमेंट हायर सेकंडरी स्कूल, पेडणे),व किंवा चतुर्थी आरोंदेकर ९७६४९३५७९५ यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन इयत्ता दहावीचे पेडणे परीक्षा केंद्र प्रमुख नरेंद्र नाईक (९८५०४५०४५५) यांनी केले आहे.

### खोलपेवाडी साळ येथे आज ‘संगीत एकच प्याला’ नाट्य प्रयोग

■ टीम दैनिक हेराल्ड

**साळ, दि. २१ :** डिचोली तालुक्यातील खोलपेवाडी साळ येथील श्री केळेश्वर कला क्रीडा आणि सांस्कृतिक मंडळाच्या २०व्या वर्धापन दिनानिमित्त सालाबाद प्रमाणे शनिवार दि. २२ रोजी रात्री १० वाजता श्री केळेश्वर रंगमंच – खोलपेवाडी साळ येथे श्री राष्ट्रोळी – दत्त नाट्य मंडळ – सावंतवाडा दोडामार्ग सहर्ष सविनय सादर करणार कै. राम गणेश गडकरी लिखित गोकुळदास तोरसकर दिग्दर्शीत तीन अंकी सामाजिक अजरामर ‘संगीत एकच प्याला’ हा नाट्यप्रयोग सादर केला जाणार आहे. या नाट्यप्रयोगात गोकुळदास तोरसकर, गोविंद (भाऊ) मराठे, श्रीधर रेडकर, सर्वेश परब, वैभव रेडकर, देवानंद बेतकेकर, रामचंद्र मणेरीकर, सुजय खांबल, लक्ष्मण रेडकर, विक्रम सावंत, प्रसाद बोर्डेकर, जीजी रेडकर, ओंकार रेडकर, संतोष आरोंदेकर, आत्माराम बोर्डेकर, आर्यन रेडकर, गीताली मातोंडकर व शारदा शेटकर आदी कलाकार सहभागी होणार आहेत. या नाट्यप्रयोगास ऑर्गन साथ आनंद नाईक, तबला – सुविशांत बोर्डेकर यांची असून पार्श्वसंगीत दिपक बर्वे तर अविनाश (बाबो ) सावंत यांचे ध्वनी संयोजन सुधीर सावंत व कृष्णराज बोर्डेकर यांचे सहाय्यक दिग्दर्शन आहे. या नाट्यप्रयोगाचे श्री केळेश्वर सांस्कृतिक कला आणि क्रीडा मंडळआणि खोलपेवाडी साळ ग्रामस्थ हे व्यवस्थापक आहेत.तरी रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी असे प्रसिद्ध केले आहे.

### मोरजी येथे महाशिवरात्री निमित्त पेहुणे तालुका मर्यादित खुली अभंग गायन स्पर्धा

■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. २१ :** मोरजी येथे महाशिवरात्री निमित्त पेहुणे तालुका मर्यादित खुली अभंग गायन स्पर्धा बुधवार दि. २६ रोजी श्रीमान योगी मंडळ मोरजी, श्री महादेव मंदिर मोरजी येथे आयोजित करण्यात आली आहे. अभंग गायन स्पर्धा विठ्ठल सावंत यांनी आपल्या मातोश्री कै. सौ. राधाबाई भि– सावंत– व कै. भिकाजी सावंत यांच्या स्मरणार्थ २७वी स्पर्धा पुरस्कृत केली आहे। प्रथम बक्षीस ४००० रु. द्वितीय रु. २०००, तृतिय रु. १५००, उत्तेजनाचे एक हजार रुपये. सविस्तर माहितीसाठी खलील नंबरवर संपर्क साधावा, असे मंडळाचे अध्यक्ष लक्ष्मीकांत शेटगावकार यांनी कळविले.

### कैलाशनगर अस्नोडा येथे महाशिवरात्रीनिमित्त विविध कार्यक्रम

■ टीम दैनिक हेराल्ड

**साळ, दि. २१ :** कैलासनगर अस्नोडा येथील श्री देव महेश्वर मंदिरात महाशिवरात्री उत्सव विविध कार्यक्रमांनी साजरा करण्यात येणार आहे. मंगळवार दि. २५ रोजी रात्री ९ वाजता साई पूर्वा आर्टस गोवा प्रस्तृत अजरामर नाट्यकृती ‘नटसम्राट’ हा नाट्यप्रयोग सादर केला जाणार आहे. याचे आयोजक क्रिएटिव्ह बॉईज – कैलासनगर अस्नोडा आहेत. बुधवार दि. २६ रोजी महाशिवरात्री निमित्त मंदिरात सकाळी ७ वाजल्यापासून भाविकांकडून श्री मूर्तीस अभिषेक सुरू होऊन दुपारपर्यंत चालू राहील. रात्री ९ वाजता कला आणि सांस्कृतिक खाते, पणजी यांच्या सौजन्याने गोव्यातील नामांकित कलाकारांतर्फे सुगम संगीत कार्यक्रम संगीत स्वर धारा सादर करण्यात येणार आहे. तरी आपण सर्वांनी श्री दर्शन, कृपाशीर्वाद व तीर्थप्रसादाचा लाभ घ्यावा, असे श्री महेश्वर देवस्थान संस्थान कमिटी – कैलासनगर अस्नोडा च्या वतीने केले आहे.

### नार्वे येथील सप्तकोटेश्वर मंदिरात महाशिवरात्रीनिमित्त कार्यक्रम

■ टीम दैनिक हेराल्ड

**डिचोली, दि. २१ :** नार्वे येथील श्री सप्तकोटेश्वर मंदिरात महाशिवरात्री उत्सव खालील कार्यक्रमांशी संपन्न होणार आहे. मंगळवार दि. २५ रोजी श्रींस अभिषेक, रात्री श्रींची पालखीतून मिरवणूक, रात्री १०.१५ वाजता श्री सप्तकोटेश्वर बालहौशी नाट्य मंडळ देऊळवाडा नार्वेतर्फे पौराणिक संगीत नाटक श्री स्वामी समर्थ. विठ्ठल पारवाडकर लिखित या नाटकाचे दिग्दर्शन रमाकांत नाईक यांनी केले असून संगीत दिग्दर्शन चांगदेव नाईक यांनी केले आहे. तबला साथ सुविशांत बोर्डेकर. यात अथर्व बांदेकर, सुधीर चोडणकर, भावना साळगावकर, संतोष साखळकर, सखाराम गावडे, सुरेश फडते, निळकंठ नार्वेकर, सर्वेश चोडणकर , दुर्वेश उसपकर, निलेश मयेकर ,जयेश वालावलकर, प्रेमानंद नार्वेकर, किरण मांजरेकर ,ज्योत्स्ना परब गावकर आणि स्वामी समर्थांच्या आव्हानात्मक भूमिकेत नंदा आनंद नार्वेकर या कलाकारांनी भाग घेतला आहे. बुधवार दि. २६ रोजी महाशिवरात्रीच्या दिनी पहाटेपासून श्रींस अभिषेक, रात्री ९ वाजता श्रींची वाजत गाजत पालखीतून मिरवणूक, १०.१५ वाजता श्री सप्तकोटेश्वर बालहौशी नाट्य मंडळातर्फे ३ अंकी संगीत ऐतिहासिक दणदणीत नाटक हर हर महादेव, लेखक कमलाकर बोरकर, दिग्दर्शक अनंत खांडेकर, संगीत दिग्दर्शक चांगदेव नाईक, तबला सुविशांत बोर्डेकर. यात अनंत खांडेकर, गुरुदास बाले, संदीप चोडणकर, पार्थ कामत सातोस्कर, शेखर नाईक, कपिल कर्पे, चंद्रकांत कोळकणकर, समर्थ पटेकर, विद्यानंद पडोळकर, दीक्षा वेंगुर्लेकर, दामोदर पटेकर, मास्टर विष्णू कालिदास शेट आदी कलाकार आहेत. व्यवस्थापक श्री सप्तकोटेश्वर बालहौशी नाट्य मंडळ नार्वे, या महाशिवरात्री उत्सवाला सर्वांनी उपस्थित राहावे तसेच दोन्ही नाट्यप्रयोगांचा आस्वाद घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# आफ्रिकेचा अफगाणिस्तानवर दणदणीत विजय

## रायन रिक्लेटनचे शानदार शतक | रबाडा, लुंगी एनगिडीच्या भेदक गोलंदाजी

**कराची, दि. २१ :**

चॅम्पियन्स ट्रॉफीच्या तिसऱ्या सामन्यात दक्षिण आफ्रिकेने अफगाणिस्तानवर मोठा विजय मिळवला आहे. कराचीमध्ये खेळवल्या गेलेल्या या सामन्यात दक्षिण आफ्रिकेने अफगाणिस्तानला १०७ धावांनी सहज पराभूत केले. रायन रिक्लेटनच्या उत्कृष्ट पहिल्या शतकाच्या जोरावर, दक्षिण आफ्रिकेने ३१५ धावांची मजबूत धावसंख्या उभारली होती, त्यानंतर कागिसो रबाडा आणि लुंगी एनगिडीच्या भेदक गोलंदाजीच्या जोरावर दक्षिण आफ्रिकेच्या वेगवान गोलंदाजांनी अफगाणिस्तानला केवळ २०८ धावांत गुंडाळले.

आफ्रिकेने दिलेले ३१६ धावांचे लक्ष्य घेऊन अफगाणिस्तान उतरली खरी परंतु, विशाल लक्ष्याचा पाठलाग करताना अफगाणिस्तानची फलंदाजी घसरली. पहिल्या दोन विकेट अवघ्या ४० धावांच्या आत पडल्या. त्यानंतर सईदुल्ला अटल हा रनआऊट झाला. यानंतर रेहमत शाह यांनी अफगाणिस्तानचा डाव सावरण्याचा प्रयत्न केला. सध्या तो फलंदाजी करीत आहे. आज कर्णधार हशमुतुल्लाह शाहिदी अवघ्या ० शून्यावर बाद झाला. त्यानंतर अझमुतुल्लाह ओमराझे याने १८ धावा केल्या. लुंगी एनगिडीने चौथ्या षटकात रहमानउल्ला गुरबाजला पॅव्हेलियनमध्ये पाठवले तर




रबाडाने १०व्या षटकात इब्राहिम झादरानला बाद केले. पुढच्या ५ षटकांत अफगाणिस्तानने कर्णधार हशमतुल्ला शाहिदी आणि सेदिकुल्लाह अटल यांच्या विकेट्सही गमावल्या, तर धावसंख्या केवळ ५० धावांपर्यंतच पोहोचू शकली.

यानंतरही धावांपेक्षा जास्त अफगाणिस्तानचे विकेट पडत होते. पण रहमत शाहने दुसऱ्या बाजूने दक्षिण आफ्रिकेला एकट्याने तोंड दिले. त्याने एकहाती ९० धावा केल्या पण संपूर्ण संघ २०८ धावांवर सर्वबाद झाला. दक्षिण आफ्रिकेकडून कागिसो रबाडाने सर्वाधिक ३ विकेट घेतले.

तत्पूर्वी, दक्षिण अफ्रिकेने प्रथम फलंदाजी करताना अफगाणिस्तान समोर ३१५ धावांचे विशाल लक्ष्य ठेवले. यामध्ये रेयान रिकल्टनने शानदार शतक झळकावत दक्षिण अफ्रिकेला एक सन्मानजनक स्कोअरपर्यंत नेऊन ठेवले. यामध्ये कर्णधार बवुमाने ७६ चेंडूत ५८ धावा केल्या तर वान देर दुसेनने ४६ चेंडूत ५२ धावा केल्या. तसेच मार्करामने नाबाद ५२ धावा ठोकत अफ्रिकेला ३०० धावांच्या पार नेले. इतर फलंदाज विशेष कामगिरी करू शकले नाहीत. द. अफ्रिकेने निर्धारित ५० षटकांमध्ये ६ विकेट गमावून ३१५ धावा केल्या. अफगाणिस्तानकडून मोहम्मद नबीने सर्वाधिक २ विकेट घेतल्या. तर फझ्लुल्लाह फारुखी, अढमतुल्लाह, नूर अहमदला प्रत्येकी १ विकेट मिळाली. यामध्ये सर्वात महागडा गोलंदाज फारुखी ठरला. त्यानंतर स्टार गोलंदाज रशिद खानसुद्धा महागडा ठरला त्याला एकही विकेट मिळाली नाही. नूर अहमदने ९ ओव्हरमध्ये ६५ धावा दिल्या.

# मुंबई इंडियन्सची नवीन जर्सी लाँच

**मुंबई, दि. २१ :**

आयपीएल २०२५ येत्या २२ मार्चपासून सुरू होत आहे. या मोसमातील पहिला सामना कोलकाता नाईट रायडर्स आणि रॉयल चॅलेंजर्स यांच्यात ईडन गार्डन्सवर होणार आहे. दरम्यान, नवा आयपीएलचा सीझन सुरू होण्यापूर्वी मुंबई इंडियन्सने आपली नवी जर्सी लाँच केली आहे. फ्रँचायझीने जर्सी लाँचचा आपल्या सोशल मीडिया अकाउंटवर एक व्हिडिओ जारी करून चाहत्यांशी शेअर केली. कॅप्टन हार्दिकने व्हिडीओमध्ये चाहत्यांना भावनिक संदेशही दिला आहे.

पंड्याने संघाचे प्रमुख खेळाडू रोहित शर्मा, जसप्रीत बुमराह, सूर्यकुमार यादव आणि तिलक वर्मा यांच्यासह फ्रँचायझीचा वारसा पुढे



नेण्याविषयी या व्हीडिओमध्ये म्हटले आहे. जर्सी लाँच झाल्याची बातमी मुंबई इंडियन्सने एका व्हिडिओद्वारे चाहत्यांसोबत शेअर केली. या व्हिडिओमध्ये हार्दिक पंड्या म्हणाला की, प्रिय पलटन, मागील सीझन संघासाठी फारसा चांगला नव्हता. पण आता नवा सीझन येत आहे. या संघाचा वारसा परत आणण्याची संधी २०२५ च्या सीझन घेऊन येत आहे.

पुढे हार्दिक म्हणाला, निळा आणि सोनेरी रंगाच्या जर्सी परिधान करत आम्ही मैदानावर उतरून मुंबईच्या स्पिरिटप्रमाणे खेळणार आहोत. ही फक्त जर्सी नाहीय, हे तुम्हा चाहत्यांसाठी एक वचन आहे. चला भेटू वानखेडेवर. मुंबईची नवी जर्सी खूप कमाल दिसत आहे. संघाच्या जर्सीमध्ये नेहमीप्रमाणे निळा आणि सोनेरी रंग आहे. जर्सीच्या उजव्या बाजूला प्रायोजकांचा लोगो आहे. त्याच वेळी, मुंबई इंडियन्स फ्रँचायझीचा लोगो डाव्या बाजूला दिसत आहे. मुंबई इंडियन्सच्या काही खेळाडूंनी या जर्सीमध्ये त्यांचे फोटोशूटही केले आहे. तर मध्यभागी किट पार्टनर्सचा लोगो आहे.

# रोहितच्या ११ हजार वनडे धावा पूर्ण

**दुबई, दि. २१ :**

चॅम्पियन्स ट्रॉफीच्या दुसऱ्या सामन्यात भारताने बांगलादेशचा ६ विकेट्सने पराभव केला. दुबई स्टेडियमवर झालेल्या सामन्यात भारताने बांगलादेशला २२८ धावांत गुंडाळल्याने मोहम्मद शमीने पाच विकेट्स घेतल्या. प्रत्युत्तरात, शुभमन गिलच्या शतकाच्या जोरावर भारताने ४६.३ षटकांत लक्ष्य गाठले.

गुरुवारचा दिवस रोहित शर्मा आणि मोहम्मद शमी यांच्या नावावर विक्रमांचा होता. रोहित ११ हजार एकदिवसीय धावा करणारा दुसरा सर्वात जलद खेळाडू ठरला. शुभमनने ५१ डावांमध्ये ८ एकदिवसीय शतके केली. शमी चेंडूंच्या बाबतीत २०० एकदिवसीय विकेट्स घेणारा सर्वात जलद गोलंदाज बनला आहे. कोहलीने एकदिवसीय सामन्यांमध्ये त्याचे १५६ झेल पूर्ण केले.

२०२३ च्या विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यानंतर भारतीय संघाने सलग ११ वेळा नाणेफेक गमावली आहे. या बाबतीत त्यांनी नेदरलँड्सची बरोबरी केली. मार्च २०११ ते ऑगस्ट २०१३ पर्यंत संघाने ११ वेळा टॉस गमावले होते.

चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये भारताविरुद्ध शतक करणारा तौहीद हृदयॉय हा पहिला बांगलादेशी खेळाडू ठरला. एकूणच, चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये भारताविरुद्ध शतक करणारा तो सहावा खेळाडू आहे. चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये भारताकडून पाच विकेट घेणारा मोहम्मद शमी दुसरा गोलंदाज आहे. त्याच्या आधी रवींद्र जडेजाने २०१३ मध्ये वेस्ट इंडिजविरुद्ध हा पराक्रम केला होता. चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये पदार्पणात शतक करणारा तौहीद हा ११ वा खेळाडू आहे. स्पर्धेत शतक करणारा तो तमिम इक्बालनंतर दुसरा बांगलादेशी खेळाडू आहे.

### भूमिकाने मिळवले राष्ट्रीय किकबॉक्सींग स्पर्धेत गोव्यासाठी मिळवले सुवर्णपदक

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. २१ :** कुजिरा बांबोळी येथील श्रीनिवास सिनाई डेम्पो महाविद्यालय येथील प्रथम वर्ष वाणिज्य मधील विद्यार्थिनी कु. भूमिका अथम यांनी राष्ट्रीय किकबॉक्सिंग स्पर्धेमध्ये गोवा राज्यासाठी पहिले स्थान आणि सुवर्णपदक मिळवले. कुमारी भूमिकाला हिला याआधी गोवा राज्य स्तरावर तीनदा सर्वोत्कृष्ट स्पर्धक’ म्हणून सन्मानित करण्यात आले आहे. भूमिकाने कोलकाता पश्चिम बंगाल मध्ये आयोजित केलेल्या ४१–४५ किलोमध्ये (वरिष्ठ श्रेणी) गटामध्ये इंडिया ओपन मार्शल आर्ट्स किकबॉक्सइंग चॅम्पियनशिप मध्ये नेत्रदीपक कामगिरी केली असून तिचे कौतुक होत आहे. एसएस डेम्पो



**मडगाव : सुवर्ण पदक मिळवलेली विद्यार्थीनी भूमिका प्राचार्य मनोज कामत व महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक मायकल डायस.**

कॉलेजचे प्राचार्य प्रा. मनोज कामत यांनी कॉलेजचे शारीरिक शिक्षण संचालक डॉ. मायकल डायस यांच्या उपस्थितीत भूमिकाचे अभिनंदन केल्याचे प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे.

# प्रायॉरिटी टायटन्सचा पाचवा विजय

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. २१ :** गोवा जीएसबी स्पोर्टस् अँड चॅरिटेबल ट्रस्ट यांनी गोवा सारस्वत समाज यांच्या सहकार्याने आयोजित केलेल्या आल्कॉन जीएसबी युनिटी कप टी–२० क्रिकेट स्पर्धेत गुरुवारी मडगावच्या एमसीसी मैदानावर विद्युतझोतात झालेल्या सामन्यात प्रायॉरिटी टायटन्सने मडगाव रॉयल्सचा ४ गडी राखून पराभव केला. प्रायॉरिटीने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी निवडल्यानंतर रॉयल्सकडून केवळ कार्तिक हट्टंगडी (१७ चेंडूंत ३२) व दामोदर पै पाटणेकर (३६) यांनी धावांची तिशी ओलांडली. डावातील एक चेंडू शिल्लक असताना त्यांचा संपूर्ण डाव १३२ धावांत संपला. प्रायॉरिटीने यानंतर ६




**मडगाव : प्रकाश कुंदे यांच्याकडून मॅन ऑफ द मॅच पुरस्कार स्वीकारताना मनीष काकोडे व व्यंकट बिचे यांच्याकडून हिरो ऑफ द मॅच पुरस्कार स्वीकारताना सिद्धार्थ घाणेकर.**

गडी गमावून व ५ चेंडू शिल्लक ठेवत सामना जिंकला. समर दुभाषी (३६), सचिन सरदेसाई (२६), अनीश महांबरे (२२) व सिद्धार्थ घाणेकर (नाबाद २०) यांनी प्रायॉरिटीच्या विजयात मोलाचे योगदान दिले. १२ धावांत २ गडी बाद केलेला मनीष काकोडे सामनावीर पुरस्काराचा मानकरी ठरला. या विजयासह प्रायॉरिटीने १० गुणांसह टॉप ४’ संघांतील आपला जागा निश्चित केली आहे. पराभवानंतरही मडगाव रॉयल्सचा संघ शर्यतीत आहे.

संक्षिप्त धावफलक – मडगाव रॉयल्स – १९.५ षटकांत सर्वबाद १३२ (दामोदर पै पाटणेकर ३६, कार्तिक हट्टंगडी ३२, अर्श सरदेसाई २१, स्मितेश दिवेकर ७–२, मनीष काकोडे १२–२, विक्रांत प्रभू २२–२, प्रणव बिचे १९–१, श्रीधर केणी २१–१, सिद्धार्थ घाणेकर २३–१) पराभूत वि. प्रायॉरिटी टायटन्स – १९.१ षटकांत ६ बाद १३३ (समर दुभाषी ३६, सचिन सरदेसाई २६, अनीश महांबरे २२, सिद्धार्थ घाणेकर नाबाद २०, संप्रभ फळदेसाई २२–१, कार्तिक हट्टंगडी ११–१, आदित्य दलाल १८–१, ग्रांथिक बुयांव २९–१).

# संस्कृतीची ओळख लहानपणी होणे आवश्यक

## श्रीपाद देसाई : सरस्वती शिशु वाटिका उसगावतर्फे शिवजयंती

■ टीम दैनिक हेराल्ड

**गुळेली, दि. २१ :** सर्वोदय शिक्षण संस्था संचालित विद्याभारती सरस्वती शिशु वाटिका उसगाव येथे शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून अध्यापक श्रीपाद प्रभुदेसाई, विशेष अतिथी नरेश नाईक इतर मान्यवरात, शिशुवाटिका संरक्षक निला बाळवे, पल्लवी येडे (अध्यक्षा पालक शिक्षक संघ) कार्यक्रम प्रमुख सपनेश नाईक उपस्थित होते.

यावेळी श्रीपाद देसाई म्हणाले की, आपल्या संस्कृतीची ओळख लहानपणापासून मुलांवर होणे आवश्यक आहे. यासाठी कार्यक्रमांच्या माध्यमातून लहान मनावर ही रुजवण्याचे शिशुवाटितील शिक्षिकांचे व पालकांचे प्र यत्न वाखाणण्याजोगे आहे, असे ते म्हणाले. स्वागत, पालक शिक्षक संघ



**उसगाव : शिवकालीन वेशभूषत सरस्वती शिशु वाटिका उसगावचे विद्यार्थी सोबत मान्यवर व शिक्षिका.**

उपाध्यक्षा प्रणाली डांगी यांनी केले.

मशाल पेटवून आणि ध्वजा फडकावून शोभा यातत्रेचे उद्‌घाटन करण्यात आले सदर शोभायात्रा नवीन उभारलेल्या शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला प्रदक्षिणा घालून परत कार्यक्रम ठिकाणी पर्यंत आणण्यात आली. आजी माजी विद्यार्थी व पालकाचा सहभाग या शोभायात्रेत होता.

यावेळी उरुण, उदय व प्रभात गटातील विद्यार्थ्यांनी शिवकालीन वेशभूषचे सादरीकरण केले.

शिक्षिका अनुष्का कुर्टिकर आभार सूत्रसंचालन शिक्षिका स्मिता च्यारी यांनी केले. कार्यक्रमाचे नियोजन शिक्षिका सुचिता बाबनी गाळयेकर, सहाय्यक ममता मनोज फात्रेकर सौ.छाया गावडे यांनी केले. शांती पाठाने कार्यक्रमाची सांगता झाली.



**डिचोली : ‘श्रुतीधारा’ कर्यक्रमात गायन सादर करताना कलाकार.**

# वाठादेव मंदिरात ‘श्रुतिधारा’ कार्यक्रम रंगला

■ टीम दैनिक हेराल्ड

**डिचोली, दि. २१ :** डिचोली तालुक्यातील वाठादेव येथील श्री वाठादेव मंदिरात वाठादेवचे ग्रामस्थ व प्रसिद्ध गायक सुरेंद्र गोवेकर यांचा ‘श्रुतिधारा’ हा गायनाचा कार्यक्रम फारच रंगला. श्रोत्यांनी मनसोक्त आनंद घेत उत्तम प्रतिसाद दिला. सोबतीला होते प्रसिद्ध गायक श्री दत्तगुरू केळकर आणि निमित्त होते वाठादेव मंदिर प्रतिष्ठापनेचा अठरावा वर्धापनदिन.

दि. १८ फेब्रुवारी रोजी महारुद्र स्वाहाकार, दि. १९ रोजी प्रतिवार्षिक सत्यनारायण महापूजा व त्याच दिवशी शिवजयंती साजरी करण्यात आली. शिजयंतीच्या कार्यक्रमात गावातील छोटी मोठी मुले, महिला व इतर ग्रामस्थ मोठ्या प्रमाणात सहभागी झाले होते.

झांट्ये महाविद्यालयाकडून सुरुवात केलेली ही मिरवणूक मंदिर परिसरात विसर्जित झाली. हातात भगवे झेंडे घेतलेली व शिव छत्रपतींच्या वेषातली छोटी छोटी मुले, मस्तकि भगवे फेटे धारण केलेल्या महिला व पुरुष, सोबत शिवाजी महाराजांचा जयजयकार करणाऱ्या घोषणानी परिसरात वेगळीच वातावरण निर्मिती केली.

मिरवणूक विसर्जित झाल्यानंतर मंदिर सभागृहात अनिल सामंत यांचे छत्रपतींच्या जीवनावर व्याख्यान झाले. सभागृहात शिवछत्रपतींचा वेष धारण करून बसलेल्या मुलांच्या महिला पालकांना उद्देशून सामंत म्हणाले की, आपल्या घरात जर छत्रपती जन्मावे असे तुम्हाला वाटत असेल तर आधी तुम्हाला जिजाई बनावं लागेल. आपल्या व्याख्यानातून त्यांनी छ. शिवाजी महाराजांनी डिचोलीत तालुक्यात केलेल्या कार्यावी माहिती दिली. पाऊण तास चाललेल्या ह्या व्याख्यानाने श्रोते भारावून गेले.

२० रोजी ग्रामस्थ दिलीप सावईकर यांच्यातर्फे लघुरुद्र स्वाहाकारचा धार्मिक कार्यक्रम झाला. सायंकाळी सुरेंद्र गोवेकर यांनी आयोजित केलेला ‘श्रुतिधारा’ या कार्यक्रमाने एक वेगळीच उंची गाठली. त्यांच्या बरोबर होते गायक कलाकार दत्तगुरु केळकर. साथी कलाकार ऑर्गन वर जयेंद्र गोवेकर, तबल्यावर अमित भोसले व राघव भट.

पुरिया कल्याण रागात विलंबित खयाल, आज सुदिन आयो व मद्यलय खयाल बहुत दिन बिते गाऊन त्यांनी एकाहून एक सरस अशी नाट्यगीते, अभंग सादर करून कार्यक्रम श्रवणीय केला.त्यांनी गायिलेल्या नाट्यगीतांनी पं.प्रभाकर कारेकरांची आठवण करून दिली.

सुरेंद्र गोवेकर यानी गायिलेल्या, मर्मबंधातली ठेव ही, झाले युवती मना सारख्या नाट्यगीतानी तसेच श्री. केळकर यांच्या, सांगड बांधारे भक्तीची, आम्ही आनंदे नाचू गाऊ ह्या अभंगात श्रोते तल्लीण झाले. कार्यक्रम संपूच नये असे वाटत असतानाच सर्वात्मका सर्वेश्वरा ह्या भैरवीने कार्यक्रमाची सांगता झाली तरी श्रोते बैठक सोडायला तयार नव्हते, एवढा कार्यक्रम रंगला. मंदिर समिती व सर्व ग्रामस्थ्यांच्या सहकार्याने तीन दिवशीय कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक १७० **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 170 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .